# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २४ वा शनिवार दि.२२ जून २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राज्यभरात सरकारविरोधात काँग्रेस आक्रमक

मुंबई : प्रतिनिधी राज्यभरात २१ जून रोजी काँग्रेस चांगलीच आक्रमक झाल्याचे बघायला मिळत आहे. काँग्रेसने शुक्रवारी राज्यभरात भाजप आणि महायुतीच्या सरकारचा विरोध दर्शवत रस्त्यावर उतरून निदर्शने केली आहेत. नागपूर, पुणे अकोला, अमरावती इत्यादीसह राज्यातील विविध शहरांमध्ये काँग्रेसने रस्त्यावर उतरून सरकारचा निषेध नोंदविला. या आंदोलनाला काँग्रेसने 'चिखलफेक' आंदोलन असे नाव दिले आहे. 'नीट'च्या परीक्षेसंदर्भात जो काही भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी व्हायला पाहिजे, अशी काँग्रेस कार्यकर्त्यांची मागणी आहे. दरम्यान, राज्यभरात काँग्रेस रस्त्यावर उतरून सरकारविरोधात 'चिखलफेक' आंदोलन करत आहे. नागपुरातील व्हेरायटी चौकात काँग्रेस कार्यकर्त्यांनी रस्ता अडवून तीव्र निषेध नोंदवला. यावेळी मोठ्या प्रमाणात वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली. काँग्रेसचे नेते विकास ठाकर यांच्या नेतृत्वात नागपुरातील व्हेरायटी चौकात या आंदोलनाला सुरुवात झाली. यावेळी शेकडो कार्यकर्ते रस्त्यावर उतरून भाजपचा निषेध करत आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी चिखल फेकावे असेच काम केले आहे, अशा शब्दांत काँग्रेसचे नेते विकास ठाकरे यांनी टीका केली आहे. राज्यात शेतकरी, बेरोजगार आणि विद्यार्थ्यांची कुचंबणा होत आहे. सध्याचे सरकार हे जनताविरोधी आहे. म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस नेतृत्वाने या आंदोलनाला चिखलफेक आंदोलन असे नाव दिले असल्याचेही विकास ठाकरे म्हणाले.

या वेळी नाना पटोले म्हणाले, मला, काँग्रेसला बदनाम करायचा प्रयत्न केला गेला आहे. भाजप शेतक-याचा अपमान जाणूनबुजून करत आहे. एमएसपी सरकारने जाहीर केली आहे. आज माझा मोदीजींना सवाल आहे, तुम्ही जी महागाई वाढवली त्यानुसार शेतक-याने १ रुपया खर्च केला तर त्याला चाराने पण वाचत नाहीत. काँग्रेस पक्षाने शेतक-यांचे अश्रू पुसण्यासाठी शेतक-यांच्या बांधावर जाऊन त्यांचे अश्रू पुसले. तर दुसरीकडे २०१६ ला शिवाजी महाराजांच्या नावाने योजना काढली. परंतु अद्याप त्यावर काही झाले नाही. फुलेंच्या नावाने योजना काढली, पण अद्याप त्याचे ५० हजार शेतक-यांना मिळाले नाहीत. आमचे सरकार करणार होते पण कोरोना काळ आला आणि नंतर हे खोके सरकार आले. त्यामुळे ५० हजार मिळाले नाहीत, अशा शब्दांत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी सरकारवर घणाघात केला आहे. अकोल्यात आंदोलन राज्यातील जनता अनेक समस्यांचा सामना करत असताना महाभ्रष्ट युती सरकार त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करतेय. या सरकारने जनतेला वा-यावर सोडून दिले आहे, असा आरोप काँग्रेसने अकोल्यात चिखलफेक आंदोलनदरम्यान केला. सरकारच्या प्रतिमेस चिखल लावून 'चिखलफेक' आंदोलन करण्यात आले. आंदोलनाचे यवतमाळातही पडसाद महायुती सरकारविरोधात काँग्रेसकडून आज यवतमाळच्या बसस्थानक चौकात चिखलफेक आंदोलन करण्यात आले. महाभ्रष्ट महायुती सरकार हे शेतकरीविरोधी सरकार असल्याचा आरोप करत काँग्रेसकडून केंद्र आणि राज्य सरकारच्या प्रतीकात्मक पोस्टरला चिखल फासून निषेध करण्यात आला आहे.



# निरोगी आयुष्यासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक- जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर- घुगे

## प्रभातफेरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केली योगाविषयी जनजागृती

लातूर :- योग हा आपल्या देशाने जगाला दिलेला अनमोल ठेवा आहे. नियमित योगासनामुळे आपले तन आणि मन तांदरुस्त राहण्यास मदत होते. त्यामुळे प्रत्यकाने नियमितपणे योगाभ्यास करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. दहाव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त जिल्हा क्रीडा संकुल येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी बोलत होत्या. या कार्यक्रमात अंदाजे ६ हजार लातूरकर मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. जिल्हा प्रशासान, लातूर शहर महानगरपालिका यांच्यासह पतंजलि योगपीठ, प्रजापिता ब्रह्मकुमारी, आर्ट ऑफ लिव्हिंग सुप्रभात ग्रुप, नॅशनल योगासन स्पोर्ट्स फेडरेशन ऑफ इंडिया, योगासन भारत आदींच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार शिवाजी पाटील कव्हेकर, उपजिल्हाधिकारी नितीन वाघमारे, अहिल्या गाठाळ, लातृच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रदीप ढेले, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त बालाजी मरे, लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे, शिक्षणाधिकारी नागेश मापारी, एमआयटी वैद्यकीय महाविद्यालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. माले, प्रजापिता ब्रह्मकुमारीच्या नंदा बहेन, पतंजलि योगपीठाचे राम घाडगे, राजभाऊ खंदाडे, डॉ. अशोक सारडा, डॉ. कलमे यावेळी उपस्थित होते. 'योग- स्वतःसाठी आणि समाजासाठी' हे यावर्षीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे बोधवाक्य असून त्यानुसार प्रत्येकाने स्वतःसाठी योगाभ्यास केला पाहिजे, तसेच समाजातील इतरांनाही योगाचे महत्व सांगून योगाभ्यासासाठी प्रोत्साहित करून सामाजिक स्वास्थासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. योग ही एक जीवनशैली असून लहानपणापासूनच या जीवनशैलीचा अंगीकार केल्यास आपले पूर्ण आयुष्य संतुलित बनण्यास मदत होईल, असे त्या म्हणाल्या. निरोगी आयुष्यासाठी ज्याप्रमाणे नियमित योगा आवश्यक आहे, त्याचप्रमाणे आपल्या पर्यावरणाच्या संवर्धनासाठी वृक्ष लागवडीची आवश्यकता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाने एक व्यक्ती, एक झाड या संकल्पनेतून आपल्या शेतात, घरासमोर, रिकाम्या जागेत एक तरी वृक्ष लावावा. यंदा वटपौर्णिमा आणि आंतरराष्ट्रीय योग दिवस एकाच दिवशी आला असून महिलांनी वडाच्या झाडाचे पूजन करण्यासोबतच वडाचे एक झाड लावून त्याची जोपासना करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. प्रारंभी आयुष मंत्रालयाचे विकास पाटील यांनी प्रास्ताविकात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उद्देश आणि योगाभ्यासाचे महत्व सांगितले. यावेळी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या हस्ते वडाच्या रोपाचे पूजन करण्यात आले. रुद्रा स्पोर्ट्सच्या चमूने यावेळी योगा नृत्य सादर केले. त्यानंतर योग मार्गदर्शक विष्णू भुतडा यांच्यासोबत उपस्थित सर्वांनी विविध योगासने केली. तसेच नियमित योगाभ्यास करण्याचा संकल्प केला.





प्रभातफेरीतून सांगितले योगाभ्यासाचे महत्व

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून जिल्हा क्रीडा संकुलपर्यंत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून योगाचे महत्व पटवून देण्यात आले. केशवराज माध्यमिक विद्यालय, देशिकेंद्र माध्यमिक विद्यालय, राजस्थान माध्यमिक विद्यालय, परिमल माध्यमिक विद्यालय, ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, सरस्वती माध्यमिक विद्यालय, शिवाजी माध्यमिक विद्यालय, सदानंद माध्यमिक विद्यालय, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, श्री श्री रविशंकर माध्यमिक विद्यालय, शारदा इंटरनॅशनल स्कूल, संत नामदेव माध्यमिक विद्यालय, यशवंत माध्यमिक विद्यालय, शांतिनिकेतन इंग्लिश स्कूल, साने गुरुजी माध्यमिक विद्यालय, स्वामी विवेकानंद माध्यमिक विद्यालय, जिजामाता कन्या प्रशालेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रभातफेरी आणि योगाभ्यासात सहभागी झाले होते.

## सुधीर दादा देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या वतीने तिरुपती बालाजी प्रतिमा भेट



लातूर :- लातूर उपविभागीय कार्यालयातील मनमिळाऊ स्वभावाचे सर्वांच्या परिचित असलेले नायब तहसीलदार सुधीर दादा देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना मुंबई,जिल्हा शाखा लातूरच्या वतीने तिरुपती बालाजी यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हनवते, शहर जिल्हाध्यक्ष महादेव डोंबे, जिल्हा उपाध्यक्ष अफसर कारभारी, जिल्हा कोषाध्यक्ष अरुण कांबळे उपस्थित होते.

## चांदीला पुन्हा चकाकी, तीन दिवसात अडीच हजाराने वधारली

जळगाव : गेल्या आठवड्यात मोठी घसरण झालेल्या चांदीच्या भावात पुन्हा वाढ सुरू झाली असून तीन दिवसांत चांदी दोन हजार ५०० रुपयांनी वधारली. त्यामुळे शुक्रवार, २१ जून रोजी चांदी ९१ हजार ५०० रुपये प्रति किलोवर पोहचली.

या सोबतच सोनेही तीन दिवसात ८०० रुपयांनी वधारुन ७३ हजार रुपये प्रति तोळ्यावर पोहचले आहे.मे महिन्यात मोठी भाववाढ होऊन ९४ हजारांपर्यंत पोहचलेल्या चांदीच्या भावात जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून घसरण सुरू झाली होती. १४ जून रोजी चांदी ८८ हजार ५०० रुपयांवर आली होती. त्यानंतर चार दिवस पुन्हा चढ-उतार सुरू राहिला व १८ रोजी ती ८९ हजार रुपयांवर आली. १९ जून व २० जून रोजी प्रत्येकी एक-एक हजार रुपयांची वाढ होऊन चांदी ९१ हजार रुपयांवर पोहचली.

# आगामी विधानसभा निवडणुकांना सर्व ताकदीनिशी सामोरे जावे - भाजपा प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी :- लोकसभा निवडणूकीत भाजपा आघाडीने विजय प्राप्त केला असून पुन्हा एकदा पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी विराजमान झाले आहेत. मात्र, या निवडणुकीत काही मतदारसंघामध्ये पक्षाला पराभवाला सामोरे जावे लागले असून या पराभवाचे चिंतन आणि मंथन करत निवडणूकीत झालेल्या चुका दुरूस्त करून आगामी विधानसभा निवडणुकीला एकदिलाने व एकजुटीने व सर्व ताकदीनिशी सामोरे जावे असे आवाहन भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा लातूर लोकसभेचे निरीक्षक विक्रम पावसकर यांनी केले. प्रदेश भाजपच्या सूचनेनुसार लोकसभा निवडणुकीतील परिस्थितीचे आकलन व त्याबाबतचा आढावा घेण्यासाठी लातूर येथे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर हे निरीक्षक म्हणून आलेले होते. त्यांच्या उपस्थितीत लातूर येथील इशान स्क्वेअर येथे मतदारसंघातील प्रत्येक विधानसभेच्या कोअर कमिटीसह प्रमुख पदाधिकाजयांची बैठक पार पडली. यावेळी पावसकर बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी खा. सुनिल गायकवाड, प्रदेश सरचिटणीस तथा लोकसभा प्रभारी किरण पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांचीउपस्थिती होती. या बैठकीच्या सुरूवातीस देशाच्या पंतप्रधानपदी तिसजयांदा नरेंद्र मोदी विराजमान झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे यांनी मांडला. या ठरावास जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख यांच्यासह महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे व शहर जिल्हाध्यक्षा रागिनी यादव यांनी अनुमोदन दिले. यावेळी उपस्थितांनी टाळ्याच्या गजरात या ठरावास मान्यता दिली. भारतीय जनता पक्ष सर्वात मोठा पक्ष असून राष्ट्र प्रथम हा संस्कार पक्षाने रुजविलेला असून या संस्काराच्या आधारे आणि गत दहा वर्षात केलेल्या विकास कामांच्या बळावर भारतीय जनता पक्ष नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीला सामोरे गेला असल्याचे विक्रम पावसकर यांनी सांगितले. जनतेच्या आशा, आकांक्षा पूर्ण करायाचा प्रामाणिक प्रयत्न करीत लोकहिताच्या अनेक योजना मोदी सरकारने राबविलेल्या होत्या. त्यामुळेच देशातील जनतेने पुन्हा एकदा पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांच्या नावावर पसंतीची मोहोर उमटवली असल्याचे पावसकर यांनी स्पष्ट केले. मात्र काही मतदारसंघात जनतेत संभ्रम निर्माण करणारा प्रचार करून काँग्रेस व इंडी आघाडीने असभ्य राजकारण केली असल्याची टीका पावसकर यांनी केली. खोटे बोल पण रेटून बोल असे करत लोकशाहीची थट्टा करण्याचे काम इंडी आघाडीने केले असल्याने काही मतदारसंघात भाजपाला पराभवास सामोरे जावे लागले आहे. मात्र, या पराभवामुळे भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खचून न जाता पुन्हा एकदा एकदिलाने, एकजुटीने व सर्व ताकदीनिशी आगामी विधानसभा निवडणुकीस सामोरे जावे, असेआवाहन करून सबका साथ सबका विश्वास आणि सबका विकास या उक्तीप्रमाणे काम करावे असे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर केंद्र व राज्य सरकारने केलेली लोकहिताची कामे व विविध योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचवून त्यांच्याशी संपर्क साधल्यास विजय निश्चित होईल, असा विश्वास व्यक्त करत आगामी निवडणुका जिंकण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी करावा, असे आवाहन पावसकर यांनी केले. यावेळी माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लोकसभा निवडणुकीत झालेल्या चुकांची समिक्षा करून त्याची पुनरावृत्ती आगामी निवडणुकांमध्ये होणार नाही याची दक्षता पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी घ्यावी, असेआवाहन करून पक्षाची ध्येय धोरणे व केंद्र व राज्य सरकारने केलेली कामे प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्यासाठी बूथरचना अधिक व्यापक व सक्षम करावी, असे सांगितले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांनी प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील कोअर कमिटी सदस्य व पदाधिकाजयांशी वैयक्तिक चर्चा करतआगामी विधानसभा निवडणुकीसाठी काय रणनिती असावी याबाबतची मते जाणून घेतली. त्याचबरोबर लोकसभा निवडणुकीतील पक्षाच्या कामगिरीचा आढावाही त्यांच्याकडून घेतला.





## संपादकीय....

# मतैक्याचे मृगजळ..

प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या देशांमध्येही युक्रेनबाबत एकवाक्यता नाही. ती कमी विकसित देशांनी दाखवावी, ही अपेक्षा अयोग्यच..

गेला आठवडा युक्रेनच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. या आठवड्याच्या मध्यावर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी युद्धविरामाचा एकतर्फी प्रस्ताव मांडला. प्रस्ताव सादर करतानाच तो मान्य होण्याची शक्यता शून्य, याची पुतिन यांना पुरेपूर कल्पना असणार. भूभागांच्या स्वामित्वाची विद्यमान स्थिती मान्य असल्यास युद्धविराम घडून येऊ शकतो, असा तो प्रस्ताव. तसे झाल्यास रशियाकडून घुसखोरी झालेले युक्रेनचे चार प्रांत आणि क्रायमिया म्हणजे २० टक्क्यांहून अधिक जमिनीवर पाणी सोडावे लागणार. २४ फेब्रुवारी २०२२ रोजी सुरू झालेल्या युद्धात हजारो नागरिकांचे प्राण गेल्यानंतर, लाखो बेघर झाल्यानंतर आणि अपरिमित वित्तहानी झाल्यानंतर युक्रेन त्यास मान्यता देणार नाही हे पुतिन यांना पक्के ठाऊक होते. पण युद्धविरामासाठी आपण प्रयत्नच केला नाही, अशी नोंद इतिहासात होऊ नये यासाठी त्यांची ही चाल होती. आठवड्याअखेरीस दोन वेगवेगळ्या परिषदांमध्ये युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी हजेरी लावली. इटलीत जी-सेव्हन अतिविकसित देशांच्या परिषदेमध्ये त्यांच्या देशासाठी भरघोस आर्थिक मदतीची घोषणा झाली. ती परिषद संपत असताना स्वित्झर्लंडमध्ये आणखी एक परिषद सुरू झाली. या परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेचा विषयच युक्रेन युद्धावर तोडगा काढणे आणि युक्रेनचे भौगोलिक सार्वभौमत्व पावित्र्य अधोरेखित करणे हा होता. दोनदिवसीय परिषदेची उपस्थिती अधिक व्यापक होती. भारतासह शंभरहून अधिक देशांचे प्रतिनिधी तेथे उपस्थित होते. परंतु अंतिम ठरावास मंजुरी देण्याचे भारताने टाळले. कारण रशियास परिषदेचे निमंत्रण नव्हते. या संघर्षातील दोन प्रमुख पक्ष – युक्रेन आणि रशिया – जोवर वाटाघाटींसाठी एकत्र येत नाहीत, तोवर या संघर्षावर शाश्वत तोडगा निघू शकत नाही, अशी भारताची रास्त भूमिका होती. त्या परिषदेत ८० देशांनी युक्रेनच्या मूळ प्रस्तावास मान्यता दिली. पण भारत, सौदी अरेबिया, तुर्की, दक्षिण आफ्रिका, थायलँड, मेक्सिको, इंडोनेशिया, संयुक्त अरब अमिराती असे देश तटस्थ राहिले. ब्राझीलने केवळ प्रतिनिधी पाठवला, चीनने तेही केले नाही. अमेरिकेचे अध्यक्ष आणि 'युक्रेनमित्र' जो बायडेन उपस्थित राहिले नाहीत. त्यांनी उपाध्यक्ष कमला हॅरिस यांना धाडले. कित्येक महिने जुळवाजुळव करून आणि अनेकदा लांबणीवर पडून अखेरीस मुहूर्त मिळालेली ही परिषद तिच्या नियोजनापासूनच सपशेल अपयशी ठरत गेली. बड्या कारणासाठी बोलावलेल्या परिषदेस बडेच नाहीत, अशी फजितीसम स्थिती. या परिषदेच्या जरा आधी जी-सेव्हन परिषद थाटात झाली. मूळ गटाचे सदस्य राष्ट्रप्रमुख, परिषद सर्वसमावेशक वाटावी म्हणून 'आउटरीच' या बिरुदाखाली निमंत्रित केलेले झेलेन्स्की आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींसह आणखी काही राष्ट्रप्रमुखही हजेरी लावून गेले. मात्र इटलीत आलेल्या बहुतांना अधिक निकडीच्या स्वित्झर्लंड परिषदेस जावेसे वाटले नाही! झेलेन्स्की मित्रांच्या बेगडी युक्रेनप्रेमाचे हे निदर्शक आहे.

या सगळ्या भानगडीत नि:संदिग्ध वाटावीत अशी पावले पुतिनच टाकत आहेत. गेल्या आठवड्यात युद्धविराम प्रस्ताव सादर केला. या आठवड्यात हे गृहस्थ उत्तर कोरियात त्यांचे तऱ्हेवाईक मित्र किम जोंग उन यांच्या भेटीस गेले. त्यांनी पुतिन यांच्या युक्रेन कारवाईस पूर्ण पाठिंबा जाहीर केला. युक्रेनसाठी अमेरिका आणि तिचे मित्रदेश अजूनही जागतिक स्तरावर आपली आघाडी व्यापक करण्याच्या प्रयत्नात आहेत. तिथे रशिया मात्र उत्तर कोरिया, इराण, क्युबा, व्हेनेझुएला या देशांची आघाडी बळकट करण्याच्या प्रयत्नात आहे. चीन हा या आघाडीचा अघोषित 'निमंत्रित'! त्यामुळे रशिया आघाडीचे उपद्रवमूल्य कैक पटींनी वाढते. भविष्यात तैवानविषयी काही तरी काळेबेरे करण्याचे मनसुबे चीन आखत आहे. युक्रेनला वाचवण्याच्या लढाईत अमेरिका आणि 'नाटो'तील देश बेसावध राहिले. तैवानबाबतही असेच काहीसे घडू शकते, याचे संकेत मिळू लागले आहेत.

अमेरिका आणि तिच्या मित्रांना युक्रेनप्रश्नी रशियाविरोधी निर्णायक आघाडी निर्माण करायची असेल, तर 'तिसऱ्या' आघाडीतील अधिकाधिक देशांना आपल्याकडे वळवावे लागेल. चीनव्यतिरिक्त 'ग्लोबल साउथ' गटातील या देशांमध्ये भारतासारखे विकसनशील देश जसे मोठ्या प्रमाणावर आहेत, तसेच आफ्रिकेतील आणि दक्षिण अमेरिकेतील काही अर्धविकसित देशही आहेत. इंधन आणि युद्धसामग्रीवर भारत अजूनही मोठ्या प्रमाणावर रशियावर अवलंबून आहे. तिसऱ्या आघाडीतील इतर काही देश धान्य, खनिजे, खते, इंधन अशा विविध कारणांसाठी रशियावर अवलंबून आहेत. युक्रेनची बाजू घेऊन रशियाशी वैर पत्करायचे, तर यांचा रशियातून होणारा पुरवठा बंदच होणार. ते घटक पुरवण्याची हमी अमेरिका देऊ शकते का, हा मुख्य प्रश्न आहे. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान, ब्रिटन, जर्मनी, फ्रान्स, इटली, नेदरलँड्स, नॉर्डिक देश यांच्याकडे संसाधने किंवा संपत्ती किंवा दोन्ही प्रचंड आहे. तरीदेखील रशिया आणि चीन यांच्या एकत्रित संसाधन क्षमतेशी त्यांची तुलना होऊ शकत नाही. विकसनशील देश या दोन देशांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. युक्रेनच्या हालाविषयी तुम्हाला काहीच वाटत नाही का, अशी पृच्छा अमेरिकी मुत्सद्द्यांकडून भारताकडे वेळोवेळी केली जाते. भारतासारख्या शांतताप्रेमी देशासाठी खरे तर अशी विचारणाच औद्धत्यजनक ठरते. रशियाशी आपण विशिष्ट मर्यादेपलीकडे पूर्ण काडीमोड घेऊ शकत नाही, हे भारताने अनेकदा सांगितले आहे. जगात सर्वाधिक वेगाने विस्तारणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थेची ही अगतिकता असेल, तर इतर देशांविषयी स्थिती यापेक्षा वेगळी असणार नाही. आणखी एक बाब म्हणजे, युक्रेनबाबत जागतिक मतैक्याचा आग्रह धरणाऱ्या खुद्द अमेरिकेत तरी राजकीय मतैक्य कुठे दिसून येते? युक्रेनला मदत अदा करण्यासाठी त्या देशाने आणि विशेषत: तेथील रिपब्लिकन राजकारण्यांनी कित्येक महिने वेळ वाया दवडलाच. युक्रेनवासीयांचे हाल दाखवणाऱ्या अमेरिकेस गाझावासीयांचे हाल दिसत नाहीत.

# पॉपकॉर्न ब्रेन जनरेशन

नवीन पिढीबद्दल बहुतांश लोकांची एक प्रमुख तक्रार असते आणि ती म्हणजे ते एकाच ठिकाणी फार काळ टिकून राहत नाहीत. आपण कितीही चांगला व्हीडीओ तयार करा आणि तो किमान अर्धा तास जरी एकाच ठिकाणी बसून पाहिला तर नशीब. या मागचे कारण म्हणजे त्यांचे पॉपकॉर्न ब्रेन. होय आजकाल ही संकल्पना खूप प्रचलित झाली आहे. यात ही पिढी सतत एकानंतर दुसरा, दुस-यानंतर तिस-या विचारांच्या मागे धावत असतात. या पिढीचा मेंदू खरोखरच उतावीळ असतो आणि त्याला सारखे नवनवीन विचार सुचत असतात. दुर्दैवाने त्यांचे कोणतेच विचार फार काळ टिकत नाहीत म्हणून मानसोपचार तज्ज्ञांनी या स्थितीला पॉपकॉर्न ब्रेन ही संज्ञा वापरली. या शब्दाचा पहिला वापर २०११ मध्ये वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचे एक संशोधक डेव्हिड लेव्ही यांनी केला.पॉपकॉर्न ब्रेनची कारणे आता प्रश्न उपस्थित राहतो की, नव्या जनरेशनला पॉपकॉर्न ब्रेन म्हणण्याचे कारण काय? यासाठी कोण जबाबदार? अर्थात ब-याच अंशी पालकदेखील तितकेच जबाबदार आहेत. याचे कारण जाणून घेण्यासाठी इतिहास पहावा लागेल. दुस-या युद्धानंतर युरोप आणि अमेरिकेत जेव्हा स्थैर्य वाढले आणि विकासाचा वेग वाढला, सर्वत्र सुबत्ता दिसू लागली तेव्हा अचानक पालकांना आपण सोसलेले कष्ट मुलांना पडू नयेत, याचा विचार येऊ लागला. पाल्यांना सर्व सुखसोयी आणि सुविधा देण्याचा विचार पालकमंडळी करू लागली. या कारणांमुळेच गेल्या पाच-सहा दशकांत अमेरिका आणि युरोपीय देशांतील पालकांनी आपल्या मुलांना सर्वस्व देण्यासाठी आणि आर्थिक अडचणींमुळे स्वत: जे होऊ शकले नाहीत ते स्वप्न साकारण्यासाठी पाल्यांना हाताशी धरले. तत्कालिन काळात पालकांनी आपल्या मुलांना संगणक शिकवले, आरोग्याबाबत सजग केले, किमान एक किंवा दोन म्युझिकल इन्स्टिमेंटस शिकवले, फाइन आर्ट, डान्स, स्पोर्ट्सही शिकवले, नाट्य चळवळीत सक्रिय केले.भारतातही ट्रेंड गेल्या शतकात भारतातील मध्यमवर्गीय कुटुंब आपल्या मुलांसाठी एवढा खर्च आणि सुख सुविधा देण्यास सक्षम नव्हता. याचे प्रमुख कारण म्हणजे मर्यादित स्रोत आणि ध्येयदेखील नव्हते. त्याच बरोबर व्यावहारिक पातळीवर त्यांना कोणी स्पर्धकही नव्हता; परंतु मागच्या शतकाच्या अखेरीस भारतातही पालकांची नवी पिढी विकसित होऊ लागली. खासगी आणि सरकारी क्षेत्रात कर्मचा-यांच्या वेतनात बूम आले आणि पाल्य हेच सर्वकाही असे मानणारी पश्चिमी विचारसरणी भारतातही बळावली. भारताचे पालकही आपल्या पाल्यांत 'डिझायनर बेबी' म्हणून पाहू लागले. अमेरिका आणि युरोपमध्ये गेल्या शतकात म्हणजे ५० ते ६० च्या दशकांत पहावयास मिळालेली जीवघेणी स्पर्धा ही मागच्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात शिरली. महानगरातील पालक हे आपल्या मुलांत एवढे कौशल्य ठासून भरण्यासाठी आतूर झाले. वयाने खूपच लहान असलेल्या पाल्यांकडे क्रीडा, अभिनय, संगीत, चित्रकला किंवा अन्य क्षेत्रांतील एखाद्या स्टारप्रमाणे पाहू लागले.

या ओढाताणीतून कॉन्व्हेंट शाळेत अभ्यास करणारी मुले ही रात्री १० वाजेपर्यंत बिझी राहू लागली. या वेळी पालकांनी त्यांना पौष्टिक आहार दिला खरा; परंतु थोडा आराम केल्यानंतर गणित, विज्ञानाच्या अभ्यासाबरोबरच पोहणे, क्रिकेट, गिटार, पेंटिंग आणि डान्स शिकण्यासाठी अनेक वर्गात पाठवू लागले. परिणामी ते ना ख-या अर्थाने चांगले खेळाडू होऊ शकले ना गुणवान विद्यार्थी. एकाच वेळी सर्व गुणसंपन्न करण्याच्या नादात एक ना धड भाराभर चिंध्या अशी अवस्था झाली.

# सर्व धर्मांच्या कुंपणापलीकडील परब्रह्मास जाणणारे!

महान संत कबीर म्हणजे काळाच्या पुढे असलेले कवी संत समाज सुधारक होते. संत कबीर भारतीय भूमी मध्ये जन्म घेतलेल्या श्रेष्ठ संतांपैकी एक गुरु होत. धार्मिक थोतांडावर कडक आसूड ओढणारे आणि हजारो ग्रंथांचे पांडित्य खुजे करणाऱ्या प्रेमाच्या अडीच अक्षराचा मंत्र सांगणारे पुरोगामी संत म्हणजे कबीर महाराज होत.

महान संतश्रेष्ठ कबीर महाराज म्हणजे काळाच्या पुढे असलेले कवी संत समाजसुधारक होते. संत कबीर भारतीय भूमीमध्ये जन्म घेतलेल्या श्रेष्ठ संतांपैकी एक गुरू होत. धार्मिक थोतांडावर कडक आसूड ओढणारे आणि हजारो ग्रंथांचे पांडित्य खुजे करणाऱ्या प्रेमाच्या अडीच अक्षराचा मंत्र सांगणारे पुरोगामी संत म्हणजे कबीर साहेब! त्यांनी तत्कालीन प्रचलित असणाऱ्या धर्मातील अंधश्रद्धा व अनिष्ट प्रथा यावर दोह्याच्या माध्यमातून टीका केली. त्यांच्या लिखाणामुळे तत्कालीन अनिष्ट प्रथा आणि अंधश्रद्धा पसरवणारे भोंदू बाबा व बुवा सनातनी यांचे धाबे दणाणले होते. संत कबीर यांनी लिहिलेले बहुतांश दोहे यावर विज्ञानवादी बुद्ध धम्माचा प्रभाव दिसतो. संत कबीर हे सत्य, विज्ञान व कर्मसिद्धान्त यांवर लिहीत. त्यांचा लिखाणामुळे संत कबीर संपूर्ण जगाममध्ये प्रसिद्ध झाले. विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संत कबीर यांना गुरू मानले. एवढ्या शतकानंतरही महान संत कबीर यांनी लिहिलेले दोहे आजही समर्पक वाटतात. असे हे कबीर के दोहे युगानुयुगे विज्ञानवादी शिकवण देऊन सतत जगाला प्रेरणा देत राहतील, असे वाटते. उपदेशपर सहज सोप्या शब्दांतील काही दोहे अभ्यासुया...

कबीर घास नींदिये, जो पाऊँ तलि होइ।
उडि पडै जब आँख में, बरी दुहेली होइ।।

संत कबीरजी या दोह्यात म्हणतात, कुणालाही छोटे लेखू नये. पायाखालचे गवतही जेव्हा डोळ्यात पडते तेव्हा खूप त्रास होतो.

साई इतना दीजिये, जामै कुटुंब समाय।
मैं भी भूखा ना रहूं, साधु न भूखा जाय।।

या ओवीत कबीर थोड्यामध्ये सुखी राहण्याचा उपदेश देतात. हे ईश्वरा मला इतकेच दे की ज्याने माझ्या कुटुंबाला पुरेसे असेल आणि कधी कुणी पाहुणा घरात आला तर त्याचे अगत्यही करता येईल.

हीरा तहां न खोलिये, जहँ खोटी है हाटि।
कसकरि बांधो गठरी, उठि करि चलै बाटि।।

या दोह्यात योग्य जागेवर ज्ञानाच्या गोष्टी सांगण्याचा संदेश त्यांनी दिला आहे. ज्ञान हे हिऱ्यासारखे असते. जिथे प्रामाणिक लोक नसतील तिथे हिऱ्याची थैली उघडूच नये. उलट तिला आणखी घट्ट बांधून लवकरच त्या जागेवरून चालते व्हावे.


सब काहू का लीजिए, सांचा सबद निहार।
पच्छपात ना कीजिये, या कहे कबीर विचार।।

सत्याची महती या दोह्यातून कबीर सांगतात, सत्य कुठेही मिळाले तर ते निसंकोच भावाने ग्रहण करा. सत्याचा स्वीकार करताना भेदाभेदाचा विचार मनात येऊ देऊ नका. विचार करायची गरज नाही. अत्यंत विचारपूर्वक हा संदेश त्यांनी दिला आहे.

काशी क्षेत्रात राहणाऱ्या एका मुसलमान जोडप्यास समुद्राच्या लाटांवर मिळालेल्या पेटीत सापडलेले मुल म्हणजे संत कबीरदास होत. त्या मुलाचे नाम ठेवण्यासाठी निरूने मौलवीना बोलवले, तेव्हा ज्या ज्या वेळेस कुराण शरीफ उघडून पहिले, त्या त्या वेळेस कुराण शरीफ मध्ये सर्वत्र फक्त कबीर कबीर नावच वाचण्यास मिळाले. कबीरचा अर्थ होतो सर्वज्ञ- सबसे बडा. हे नाव ठेवण्याची मौलवीची मुळीच इच्छा नव्हती. पण इच्छा नसतांनाही त्यांचे नाव कबीर ठेवण्यात आले आणि पुढे ते बालक महान कवी व संत कबीर नावाने प्रसिद्ध झाले. निरु व निमा या जोडप्यास एकही मुल नव्हते. म्हणून त्यांनीच त्यांचा सांभाळ केला. पुढे कबीरदास मोठे झाल्यावर विणकाम करू लागले. काम करीत असताना ते देवाची भक्ती करीत असत. भजने, दोहे गात असत. देवावर त्यांची प्रगाढ श्रद्धा होती. एकदा त्यांना गिऱ्हाईक लवकर मिळेना, त्यावेळी एक भिकारी त्यांना वस्त्र नसल्यामुळे शालू मागत होता. संत कबीरांनी विणलेला शालू जो बाजारात विकायला न्यायचा होता, तो शालू भिकाऱ्याला देऊन टाकला. संत कबिरांना गुरु कोणाला म्हणावे, ते समजत नव्हते. नंतर ते काशीमध्ये आलेल्या साधू रामानंदांचे शिष्य बनले. पुढे ते रामानंदांच्या संगतीत राहिले. मुसलमान व हिंदुना रहिम व राम ऐक्याची भावना प्रकट केली व उपदेश करीत करीत ते भारतभर फिरले. त्यांचे दोहे अतिशय उच्च प्रतीचे होते. समाजाला समजेल अशा शब्दात त्यांनी उपदेश केला. देवाची आराधना आपल्या मार्गाने दुसऱ्याला त्रास न देत करावी, देव एकच आहे, असे ते सांगत. त्यांच्या एका दोह्यात म्हटले आहे कि-

सहज मिले ओ पाणी है भाई।
मांगनेसे मिले ओ दुध है।
खींच के ले तो खून है।।

अशा परखड शब्दात आपला उपदेश त्यांनी जनतेला दिला. भारतात जन्मलेले संत कबीर यांचा धर्म काय होता, याबद्दल काहीही माहिती उपलब्ध नाही. संत कबीर हे मानवजातीचे, मानवतेचे पुजारी होते. कुठल्याही प्रकारचा धर्मभेद, पंथभेद, जातिभेद यापलीकडे कबीर पोहोचले होते. या भारत देशातील यच्चयावत समाज एकमताने चालावा, एकजुटीने वागावा म्हणून ज्या महापुरुषांनी आटोकाट प्रयत्न केले, सर्व सुखी असावेत अशा विचाराने जे आमरण झटले त्यापैकी संत कबीर हे एक होत. त्यामुळे त्यांना हे हिंदू-मुसलमान ऐक्याचे प्रतीक समजले जाते.



संतश्रेष्ठ कबीरांनी केलेली राम, कृष्ण, विठ्ठल अशा अनेक हिंदू दैवतांवरील पदे उपलब्ध आहेत. कबीर सर्व धर्मांच्या कुंपणापलीकडे असलेल्या परब्रह्मस्वरूप परमेश्वराला जाणत होते आणि त्याबरोबरच हे सर्व जग चालविणारा जो परमेश्वर आहे, या सर्व जगाच्या निर्मितीमागे, या सर्व जगाच्या व्यवहारामागे ज्याची प्रचंड शक्ती उभी आहे तो ईश्वर, तो परब्रह्मस्वरूप पांडुरंग निर्गुण, निराकार आहे, हा त्यांचा विश्वास होता. त्याच्या म्हणजे परमेश्वराच्या स्वरूपाला कुठलेच बंधन मर्यादित ठेवू शकत नाही. म्हणूनच कबीरांच्या दृष्टीने सगळे साधुसंत, सगळे देव हे त्या एकाच परब्रह्मस्वरूप विठ्ठलाची लेकरे आहेत. संत रविदास कबिरांना मोठा भाऊ मानत असत. उत्तर भारतातील एक सुप्रसिद्ध संत म्हणजे संत कबीर होत. संत कबीर यांच्या जन्म वर्षाबद्दल विवाद आहेत. कोणी ते इ.स.१३७०मध्ये तर कोणी सन १३७८मध्ये जन्मले असे म्हणतात. त्यांच्या जन्माविषयी परंपरागत कथा सांगितली जाते ती अशी- ज्येष्ठ पौर्णिमेस एका ब्राह्मण विधवेच्या पोटी एक पुत्र जन्मला, पण उजळ माथ्याने त्याचे पालनपोषण करणे शक्य नाही; म्हणून तिने काशीतील एका लहरतारा सरोवराच्या काठी त्याला टाकून दिले. कर्मधर्म संयोगाने काशीतल्या एका मुस्लिम जोडप्याला तो सापडला. त्या मुस्लिम जोडप्यांचे नाव निरू व निमा होते. ते त्या मुलाचे चांगले पालनपोषण करतात आणि पुढे हाच मुलगा संतशिरोमणी कबीर महाराज या नावाने प्रसिद्ध झाला. संत कबीर जरी मुस्लिम कुटूंबात रहात होते, तरी ते रामाचे उपासक होते. संत कबीर यांच्या बद्दलची कोणतीही ठाम महिती नाही पण असे म्हणतात कि, त्यांचा विवाह झाला होता. त्यांच्या पत्नीचे नाव लोई असे होते व त्यांना एक कमाल नावाचा मुलगा आणि कमाली नावाची एक मुलगी होती. ते काशीत विणकर म्हणून काम करत होते.

संत कबीर साहेब हे १५व्या शतकातील संत होते. त्यांनी तत्कालीन रूढींवर प्रहार केले. निर्भीडता हे त्यांच्या ओव्यांचे मुख्य वैशिष्ट्य होय. तत्कालीन समाजाचे अवगुण त्यांनी अत्यंत परखडपणे दाखवले. या माध्यमातूनच त्यांनी समाजाला थोतांड आणि अवडंबरातून सोडवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ओव्या- दोहे आजही आपल्याला सन्मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात-

कबीर आप ठगाइये और न ठगिये कोय।
आप ठग्या सुख उपजै और ठग्या दु:ख होय।।

चोरी, लबाडीपासून दूर राहण्याचा उपदेश करताना संत कबीर सांगतात की, दुसऱ्याला लुटण्यापेक्षा स्वत: लुटले गेलेले बरे. कारण दुसऱ्याला लुटले तर नक्कीच त्याचे रूपांतर दु:खात होणार.

सिंहों के लेहड नाही, हंसों की नहीं पाँत।
लालों की नहीं बोरियां, साथ न चलै जमात।।

ते सांगतात, सिंह जंगलात एकटाच असतो. सिंहांचे कळप नसतात. तसेच हंसाचे थवे नसतात आणि रत्नांची पोती नसतात. याच प्रकारे संतसुद्धा जाती-जमाती घेऊन चालत नाही. तो एकटाच जगकल्याणासाठी झटत असतो.

त्यांचा मृत्यू इ.स.१५९८साली झाला असे मानले जाते. मगहर मध्येच मुस्लिम प्रथेनुसार त्यांचे दफन झाले असावे. ते आयुष्यभर काशीमध्येच राहिले, पण त्यांचा मृत्यू काशीत नसून मगहर येथे झाला, हे स्वतःच त्यांनी सांगितले आहे-

सकल जनम शिवपुरी गंवाया।
मरती बार मगहर उठि आया।।

आज ज्येष्ठ पौर्णिमा दि.२२ जून २०२४, हिंदू पंचांगानुसार आजच्या दिवशी- ज्येष्ठ पौर्णिमेला कबीर जयंती असते. भारत सरकारने सन १९५२ साली संत कबीर यांच्यावर पोस्टाचे तिकीट काढले होते, हे विशेष!

!! संतश्रेष्ठ कबीर महाराज जयंती निमित्त त्यांना व त्यांच्या लोकोपकारी कार्यांना लाखो विनम्र अभिवादन !!

**************

– संकलन व सुलेखन –

संतचरणरज: श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.
वंद.रा.सं.श्री तुकडोजी महाराज चौक,
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.

# घेतला वसा, सांडू नका: करा वृक्षारोपण बाका!

वटपौर्णिमा म्हणजे सात जन्म तोच पती मिळण्यासाठी महिलांनी करायचे व्रत होय. हे व्रत केल्यावर आपल्या पतीला जास्त आयुष्य मिळते आणि पुढच्या सात जन्मासाठी आपल्याला तोच पती मिळतो, अशी धारणा आहे. यंदा शुक्रवार, दि.२१ जून २०२४ रोजी वटपौर्णिमा आहे. या दिवशी वडाच्या वृक्षाला अनन्यसाधारण महत्व आहे. हे जाणूनच महिला यंदा मोठ्या उत्साहाने पूजाविधीनंतर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून त्यांच्या संवर्धनाचा वसा- प्रण घेणार आहेत, श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी ही महत्त्वपूर्ण माहिती प्रस्तुत करताहेत... संपादक.

हिंदू पंचांगानुसार एका वर्षात १२ पौर्णिमा असतात. या बारा पौर्णिमांपैकी ज्येष्ठ महिन्यातील पौर्णिमा आपल्याकडे वटपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. ज्येष्ठ महिन्यातील शुक्ल पक्षाची पौर्णिमा ही वटपौर्णिमा म्हणून मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. या दिवशी सूवासिनी वटपौर्णिमेचे व्रत पाळतात आणि आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास करतात. वटपौर्णिमा हा सण वटसावित्रीच्या नावानेही ओळखला जातो. या दिवशी सावित्री आणि सत्यवान यांची पूजा केली जाते. आपल्या देशात पश्चिम भारतात हे व्रत ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी पाळले जाते, तर उत्तर भारतात वटसावित्रीचा उपवास ज्येष्ठ अमावस्येला केला जातो. यंदा ज्येष्ठ वटपौर्णिमा आज दि.२१ जून २०२४ रोजी साजरी केली जाणार आहे.

वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्याठी वडाची पूजा करतात आणि उपवास करतात. या दिवशी वडाची पूजा करण्यासाठी पहाटे ५ वाजून २४ मिनिटांनी शुभ मुहूर्त सुरू होणार असून तो १० वाजून ३० मिनिटांपर्यंत असणार आहे. त्यानंतरचा, शुभ मुहूर्त हा दुपारी १२ वाजून २३ मिनिटांनी सुरू होणार असून, तो दुपारी २ वाजून ७ मिनिटांपर्यंत असणार आहे. त्यामुळे या कालावधीमध्ये सूवासिनी वडाची पूजा करू शकतात, असे पंचांग सांगते. वटपौर्णिमेचे हिंदू धर्मात विशेष असे महत्व आहे. या दिवशी स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाच्या झाडाची पूजा करतात आणि उपवास करतात. वडाच्या झाडामध्ये ब्रह्मा, विष्णू आणि महेश या त्रिमूर्तीचा वास असल्याचे मानले जाते. धार्मिक मान्यतेनुसार वटपौर्णिमेच्या एका कथेनुसार वडाच्या झाडाखाली सावित्रीने आपल्या पतीला जीवनदान दिल्याचे सांगितले जाते. त्यामुळे वडाच्या झाडाला धार्मिक महत्व अधिक आहे. यासोबतच वडाचे झाड हे १०० वर्षांपेक्षा अधिक वर्षे जगते, त्यामुळे या झाडाची वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रिया विधिवत पूजा करतात, आणि देवाकडे आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करतात. तसेच या वृक्षांचे अस्तित्व टिकावे, यासाठी वृक्षारोपण सुद्धा आवश्यक आहे, या पवित्र दिवसानिमित्त वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन कार्यक्रम आयोजित व्हायला पाहिजेत.

वटपौर्णिमेच्या दिवशी सूवासिनींनी पहाटे लवकर उठून स्नान करतात. स्नान केल्यानंतर वटपौर्णिमेच्या व्रताचा संकल्प करतात आणि नवे वस्त्र किंवा पिवळ्या रंगाची साडी परिधान करतात. त्यानंतर १६ श्रृंगारांचा साज करतात. नंतर वडाच्या झाडाची पूजा करण्यासाठी ताट तयार करून घेतात. त्यासाठी ताटात फुले, कापसाची पोत, अक्षता, हळदी-कुंकू, उदबत्ती, पांढरा दोऱ्याचा रीळ, मिठाई, आंबा, जांभूळ, करवंद, फणस इत्यादी फळे ठेवतात. ही सर्व फळे उपलब्ध नसतील तर यापैकी कोणतेही एक फळ घेतात. शक्यतो आंबा ताटात ठेवतात. शुद्ध पाण्याचा गडवा- तांब्या आणि निरांजन सोबत ठेवतात. सुरूवातीला वडाच्या झाडाला पाणी वहातात. त्यानंतर हळदी-कुंकू, अक्षता, फुले कापसाची पोत वहातात, झाडाचे औक्षण करतात. त्यानंतर पांढरा दोरा वडाला बांधून ७ वेळा झाडाला प्रदक्षिणा घालतात. पतीच्या दीर्घायुष्यासाठी मनोभावे प्रार्थना करतात, विवाहित स्त्रियांना सौभाग्याचे लेणे देऊन त्यांचा आशीर्वाद घेतात. या पूजाविधीत वृक्षांची साथ वेळोंवेळी लागते, म्हणून प्रत्येक वटपौर्णिमेस प्रत्येक महिलेने वृक्षारोपणाचा वसा घ्यावा व नित्यनेमाने पाळावा.

या व्रतामागे एक पारंपरिक सावित्री आणि सत्यवान यांची पौराणिक आख्यायिका सांगितली जाते. अनेक वर्षापूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला सावित्री नावाची कन्या होती. सावित्री अतिशय सुंदर, नम्र व गुणी मुलगी होती. ती उपवर झाल्यावर राजाने तिलाच आपला पती निवडण्याची परवानगी दिली. स तिने सत्यवान नावाच्या राजकुमाराची निवड केली. सत्यवान हा शाल्व राज्याचा धृमत्सेन नावाच्या अंध राजाचा मुलगा होता. शत्रूकडून हरल्यामुळे आपल्या राणी व मुलासहित राजा जंगलात राहत होता. भगवान नारदाला सत्यवानाचे आयुष्य केवळ एक वर्षाचेच असल्याचे माहीत असल्यामुळे त्यांनी त्याच्याशी लग्न करू नको असा सल्ला सावित्रीला दिला होता. पण सावित्रीने ते मान्य केले नाही. तिने सत्यवानाशी विवाह केला व जंगलात येऊन ती नवऱ्याबरोबर सासू सासऱ्याची सेवा करू लागली. सत्यवानाचा मृत्यू जेव्हा तीन दिवसावर येऊन ठेपला तेव्हा तिने तीन दिवस उपवास करून व्रत आरंभिले. सत्यवान जंगलात लाकडे तोडण्यास निघाला असता ती त्याच्या बरोबर गेली. लाकडे तोडता तोडता त्याला घेरी आली व तो जमिनीवर पडला. यमधर्म तिथे आला आणि सत्यवानाचे प्राण नेऊ लागला. सावित्री यमाच्या मागे आपल्या पतीबरोबर जाऊ लागली. यमाने अनेक वेळा तिला परत जाण्यास सांगितले. पण तिने साफ नाकारले व पतीबरोबर जाण्याचा हट्ट धरला. अखेर कंटाळून यमाने पती सोडून तिला तीन वर मागण्यास सांगितले. सावित्रीने सासूसासऱ्याचे डोळे व राज्य परत मागितले व आपल्याला पुत्र व्हावा असा वर मागितला. यमराजाने गफलतीने तथास्तु म्हटले. तेव्हा त्याला वचनबद्ध झाल्याची आठवण झाली व सत्यवानाचे प्राण परत करावे लागले. सत्यवानाचे प्राण सावित्रीने वडाच्या झाडाखालीच परत मिळविले म्हणून ज्येष्ठ महिन्यात पौर्णिमेला स्त्रिया वडाच्या झाडाची पूजा करून उपवास करतात व वट सावित्री व्रत आचरतात. आता आधुनिक सावित्रींनी भरपूर वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन करून या संपूर्ण जीवसृष्टीचा गुदमरलेला जीव वाचविण्यास व्रतस्थ वागले पाहिले.

!! वटपौर्णिमेच्या समस्त भगिनींना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

********

– संकलन व सुलेखन –

श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली,
फक्त व्हॉट्सप- ९४२३७१४८८३.

# मुंबईतील पदपथावरील खाद्यपदार्थ विक्रेतावर पालिकेतर्फे कारवाईचा बडगा

महावृत्त – शहामत शेख. मुंबई– (कांदिवली ) मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यालगत खाद्यपदार्थ विकणारे रडारावर असून,येत्या काही दिवसात यावर कारवाईच्या बडगा उगारला भरला जाणार आहे.महापालिका विभागीय कार्यालयातर्फे दिवसा ही कारवाई करण्यात येणार आहे. तसेच परिमंडळ निहाय पथकाकडून सायंकाळी ६ ते ९ या वेळेत कारवाई करण्यात येणार आहे. तसेच विभाग कार्यालयांतील अतिक्रमण निर्मूलन पथकांना कारवाई करण्याचे निर्देश उपायुक्त( विशेष) दिघावकर यांनी दिले.मुंबईमध्ये मागील काही महिन्यापासून खाद्यपदार्थ विक्रेत्यांची स्टॉल मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या वाढत्या खाद्यपदार्थ विक्रेत्यामुळे मोठ्या प्रमाणात आरोग्याचे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहे. तसेच रेल्वे स्थानक परिसरात खाद्यपदार्थ विक्रेत्यांचे स्टॉल वाढल्याने नागरिकासह विविध संस्थांची तक्रारीची दखल घेत पालिकेने कारवाई करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले आहे. रेल्वे स्थानक परिसरात शोरमा, चायनीज,वडापाव,शेवपुरी,डोसा पाणीपुरी,पावभाजी आदी खाद्यपदार्थ विक्री मोठ्या प्रमाणात होते. पावसाळ्याचे दिवस असल्याने उघड्यावर खाद्यपदार्थ विक्रेतेमुळे मोठ्या प्रमाणात आरोग्याचे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. यामुळे पालिके तर्फे कारवाई तीव्र करण्याचे निर्णय घेतला आहे. याकरिता प्रत्येक महापालिका विभागातील परवाना विभाग, अतिक्रमण विभाग आदी पथके तयार करून तीव्र कारवाई करण्यात येणार आहे.

> शोरमा विक्रेते पालिकेच्या रडावर . शोरमा खाल्ल्याने गोरेगाव व पूर्व उपनगरातील काही भागांमध्ये विषबाधाचे प्रकार समोर आले आहे. यामुळे पालिकेने शोरमा विक्रेत्यांना विशेष लक्ष केले आहे. या विक्रेत्याकडे कोणत्याही प्रकारचे परवाना नाही. यामुळे वापरले जाणारे चिकन कोणत्या दर्जाचे आहे, याची माहिती मिळणे अशक्य आहे. यामुळे शोरमा विक्रेतावर कारवाई केली जाईल, असे उपायुक्त (विशेष ) किरण दिघावकर यांनी स्पष्ट केले.

# अवघ्या काही मिनिटांत व्हाल तणावमुक्त अन् ताजेतवाने; करा फक्त 'ही' योगासने

देशभरात आज आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्वत्र उत्साह आहे. आजच्या काळातील धकाधकीच्या जीवनात योगाच्या माध्यमातून आपण आपले शरीर तर तंदरुस्त ठेवू शकतोच; त्याशिवाय मनावरही चांगले संस्कार करू शकतो. तन आणि मन यांचा एकत्रित व्यायाम म्हणजे योग, असे म्हणता येईल. तणाव किती हानिकारक आहे याबद्दल आपण बरेच काही ऐकले आहे. तणाव हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू आहे. त्यामुळे अनेक आजारांचा धोका वाढत जातो. या तणावामुळे जगभरातील लोकांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर दुष्परिणाम होत आहे. या पार्श्वभूमीवर तणावाचे व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. तणाव येत असेल, तर तुम्ही घरीच काही गोष्टी करू शकता. अवघ्या पाच मिनिटांच्या योगाने तुम्ही तणावमुक्त होऊ शकता. अशा या योगाने नैराश्य आणि चिंता लक्षणीयरीत्या कमी होण्यास मदत होते. योगातज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी दी इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना या संदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. यावेळी आज योगातज्ज्ञ कामिनी बोबडे यांनी सूर्यनमस्कार, नंतर योग निद्रा व त्यानंतर प्राणायाम करण्याची शिफारस केली आहे. सकाळी उठल्यानंतर व्यायाम आणि योगासने केल्याने तुम्हाला निरोगी राहण्यास मदत होते. पण कोणताही योगा करण्यासाठी ही योग्य वेळ आहे. जसे सूर्यनमस्कार. सूर्यनमस्कार करण्याची उत्तम वेळ म्हणजे सूर्योदयाची वेळ म्हणजे पहाटे ४:४५ ते ६ दरम्यान सूर्यनमस्कार करावेत. विविध आसनांनुसार त्यांचे फायदे खालीलप्रमाणे : सूर्यनमस्कार : त्वचा व केसांसाठी उपयुक्त त्वचा आणि केसांची काळजी घेण्यासाठी उपयुक्त. सूर्यनमस्कारामुळे शरीर डिटॉक्सिफाय होऊन सौंदर्य वाढण्यास मदत होते. हे टाळूमध्ये रक्त परिसंचरण वाढवते आणि मुलांच्या विकासाला चालना देते. या क्रियेमुळे केसांना चांगले पोषण मिळते आणि त्यामुळे केस गळणे आणि पांढरे होण्यास प्रतिबंध होतो. त्याचप्रमाणे ते चेहऱ्यातील रक्ताभिसरण वाढवतात, तसेच त्वचा निरोगी, तरुण व चमकदार ठेवण्यास मदत करतात. शवासन : तणावमुक्ती व

# डार्कनेटवर फुटले होते 'यूजीसी-नेट'चे पेपर

नवी दिल्ली : वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षा 'नीट-यूजी' २०२४ नव्याने घेण्यात यावी, अशी मागणी जोर धरत असताना शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी ही शक्यता फेटाळून लावली. 'नीट' परीक्षेबाबतच्या घटना काही ठराविक प्रदेशापुरत्या मर्यादित असून लाखो विद्यार्थ्यांनी योग्य प्रकारे परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांना फटका बसायला नको, अशी भूमिका प्रधान यांनी स्पष्ट केली. तसेच 'यूजीसी-नेट' परीक्षेचे पेपर डार्कनेटवर फुटले होते. त्यामुळेच परीक्षा रद्द करण्यात आली, असे प्रधान यांनी स्पष्ट केले.'नीट-यूजी' २०२४ परीक्षा रद्द करा आणि अनियमिततेची चौकशी करा, या मागण्या करणा-या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी केंद्र सरकार, 'एनटीए' आणि इतरांकडून उत्तर मागितले. एनटीएने नीट-यूजी २०२४ पुनर्परीक्षेचे प्रवेशपत्र जारी केले आहे. वेळेच्या कमतरतेमुळे सवलतीचे गुण मिळालेल्या १५६३ उमेदवारांसाठी ही परीक्षा घेतली जात आहे. परंतु पुन्हा परीक्षा द्यायची की नाही किंवा वाढीव गुण काढून टाकल्यानंतर शिल्लक राहिलेल्या गुणांसह पुढे जायचे हे उमेदवारांवर सोडण्यात आले आहे. नीट पुनर्परीक्षेचे प्रवेशपत्र अधिकृत वेबसाइटवर डाऊनलोडसाठी उपलब्ध आहे. २३ जून रोजी दुपारी २ ते ५.२० या वेळेत ही परीक्षा होणार आहे. तिचा निकाल ३० जून रोजी जाहीर होण्याची शक्यता आहे.संसदेत मुद्दा उपस्थित करणार पंतप्रधान मानसिकदृष्ट्या खचले आहेत आणि सरकार चालविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा



लागेल. ते रशिया-युक्रेन युद्ध थांबवतील, पण पेपरफुटी थांबवू शकत नाहीत किंवा थांबवू इच्छित नाहीत? भाजप आणि त्याच्या मातृ संघटनेशी संबंधित लोकांनी शैक्षणिक संस्था काबीज केल्या आहेत. ही परिस्थिती बदलल्याशिवाय पेपरफुटी थांबणार नाही. संसदेच्या आगामी अधिवेशनात विरोधी पक्ष पेपरफुटीचा मुद्दा उपस्थित करतील असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. ८ जुलैला होणार सुनावणी समुपदेशन रद्द करण्यास न्यायालयाने नकार दिला. नीट-यूजी २०२४ संबंधी इतर प्रलंबित प्रकरणांसह याचिकांवर ८ जुलै रोजी सुनावणी केली जाईल, असे सांगत खंडपीठाने समुपदेशन प्रक्रियेला स्थगिती देत नसल्याचे स्पष्ट केले.

## ओबीसींसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन होणार

मुंबई : ओबीसींच्या हक्कासाठी जालन्यातल्या वडीगोद्री येथे ९दिवसांपासून लक्ष्मण हाके यांचे उपोषण सुरु आहे. शुक्रवारी सरकारच्या शिष्टमंडळाने हाकेंची भेट घेतली. त्यानंतर सायंकाळी ओबीसींचे शिष्टमंडळ आणि सरकारमध्ये एक बैठक संपन्न झाली.

ओबीसी शिष्टमंडळामध्ये मंत्री छगन भुजबळ, पंकजा मुंडे, धनंजय मुंडे, प्रकाश शेंडगे यांच्यासह ओबीसी नेत्यांची उपस्थिती होती. तर सरकारच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह मंत्र्यांची उपस्थिती होती. बैठकीनंतर एक माहिती हाती येत असून ओबीसींसाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे.

# परीक्षांमधील गैरप्रकारांविरोधात काँग्रेस करणार देशव्यापी आंदोलन

नवी दिल्ली : आधी नीट आणि नंतर नेट परीक्षेतील गैरप्रकारांबाबत काँग्रेस सातत्याने मोदी सरकारवर हल्लाबोल करीत असून या मुद्यावरून काँग्रेस देशभरात आंदोलन करणार आहे. काँग्रेस पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते देशातील अनेक ठिकाणी आंदोलन करणार असल्याची माहिती काँग्रेसच्या वतीने देण्यात आली आहे. मध्य प्रदेशातील नीट, नर्सिंग घोटाळा, विविध परीक्षांमधील पेपरफुटी याप्रकरणी भोपाळमध्ये काँग्रेस पक्ष आंदोलन करणार असून दिग्विजय सिंह, जितू पटवारी यांच्यासह अनेक नेते या निदर्शनात सहभागी होणार आहेत. देशातील इतर राज्यांतही काँग्रेस आंदोलन करणार आहे.काँग्रेस नेते शशी थरूर यांनी पेपरफुटीला हास्यास्पद म्हटले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी गुरुवारी मोदी सरकारवर जोरदार हल्ला चढवला होता. भारतात सातत्याने पेपर लीक होत आहेत आणि नरेंद्र मोदी हे थांबवू शकत नाहीत किंवा थांबवू इच्छित नाहीत असे राहुल गांधी म्हणाले. भाजपशासित राज्ये ही पेपरफुटीची केंद्रे आणि शिक्षण माफियांची प्रयोगशाळा बनली आहेत. भाजप सरकार शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त करून तरुणांच्या भवितव्याशी खेळत आहे. इंडिया आघाडी हे कधीही होऊ देणार नाही, असेही राहुल गांधी म्हणाले आहेत.आतंरराष्ट्रीय हल्ले थांबविणा-यांनी पेपरफुटी थांबवावी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करताना राहुल गांधी म्हणाले की, पंतप्रधान मोदी रशिया-युक्रेन, इस्रायल-गाझा युद्ध थांबवतात, पण पेपर लीक थांबवू शकत नाहीतकिंवा थांबवू इच्छित नाहीत. भाजप आणि आरएसएसच्या लोकांनी शैक्षणिक संस्था ताब्यात घेतल्याचा दावाही राहुल गांधी यांनी केला. ही परिस्थिती बदलल्याशिवाय पेपरफुटी थांबणार नाही असेही गांधी म्हणाले. विद्यार्थी देशाचे भविष्य पेपरफुटीच्या मुद्द्यावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी पत्रकार परिषद घेतली होती. यावेळी ते म्हणाले होते की, विद्यार्थी हे देशाचे भविष्य आहेत. विद्यार्थ्यांचे कल्याण हे आमचे प्राधान्य आहे. याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही.



# मराठा-ओबीसींना सरकारकडून फिरवण्याचे काम

शिर्डी : प्रतिनिधी मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावात मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले आहेत. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण देण्याची मागणी त्यांनी केली आहे. मात्र, याला ओबीसी नेत्यांनी विरोध केला आहे. मराठा आरक्षणाविरोधात आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी उपोषण सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण तापू लागले असून दोन्ही समाजाच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप होत आहेत. या सर्व घडामोडींमध्ये विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला आहे. ते आज शिर्डीत बोलत होते.



राज्यातील सलोखा बिघडवून समाजाला उद्ध्वस्त करण्याचे काम महायुती सरकार करत आहे. सत्तेच्या लालसेपोटी महायुती सरकारने समाजाला आरक्षणाची लालूच दिली आहे. आता सरकार समाजाला उद्ध्वस्त करत आहे. आरक्षणामुळे दोन समाजांत तेढ निर्माण होत आहे , असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. ओबीसींना संविधानाने दिलेले आरक्षणाचे संरक्षण करण्याची मागणी ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केली आहे. तो त्यांचा अधिकार आहे. मात्र, महायुती सरकारने महाराष्ट्रात आरक्षणामुळे आग लावलीय. मराठ्यांसह ओबीसींना फिरवण्याचे काम सरकार करत आहे. त्यांच्या या राजकारणामुळे ते भुईसपाट होतील, असा टोला वडेट्टीवारांनी सरकारला लगावला आहे. लोकांचे पक्ष फोडण्याचे काम, सरकारी यंत्रणांचा गैरवापर करणे याशिवाय यांना काहीच कळत नाही. नीट परीक्षेत देशभरात गोंधळ झालाय. 'नेट'ची परीक्षा रद्द करावी लागली आहे. सरकारला पेपर फुटीच्या मुळापर्यंत का जाता येत नाहीय. नीट तसेच नेट परीक्षांबाबत सरकारने जबाबदारी घ्याला हवी. या संदर्भात एसआयटी स्थापन करून सरकारने सखोल चौकशी करावी, अशी मागणीही विजय वडेट्टीवार यांनी केली.

# 'या' जादुई पावडरने झपाट्याने होईल वजन कमी; फक्त एकदा डॉक्टरांकडून सेवनाची पद्धत समजून घ्या

वजन वाढणे ही आजकाल सर्वात मोठी आरोग्य समस्या आहे. यामुळे तुम्हाला विविध आजार जडतात, सोबत तुमची फिगरही खराब होते. आपल्यापैकी बरेच जण वाढलेल्या वजनाच्या समस्येने हैराण आहेत. अनियमित जीवनशैलीमुळे वाढलेल्या वजनाच्या समस्येनं सर्वच जण हैराण आहेत. शरीरातील फॅट वाढतं आणि त्यासोबतच पोटाचा घेरही वाढतो. आजच्या काळात शरीरात फॅट वाढणं ही एक मोठी समस्या झाली आहे. पोटाची वाढलेली चरबी अनेक आजारांना आमंत्रण देणारी ठरते. तुम्हीही वजन कमी करण्यासाठी धडपड करत असाल तर आयुर्वेदिक अभ्यासक डॉ. डिंपल जांगडा यांनी घरगुती उपायांनी झटपट वजन कमी कसे करता येईल, याविषयी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. आपण सविस्तर जाणून घेऊ

स्वयंपाकघरात अनेक औषधी वनस्पती आणि मसाले आहेत, ज्यात वजन कमी करण्यात आणि पचन, चयापचय, ऊर्जा आणि झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करण्याची क्षमता आहे. यापैकी काहींमध्ये कॅरम सीड्स, (ओवा) एका जातीची बडीशेप, वेलची, लवंग, आले, मिरी, स्टार बडीशेप, दालचिनी, तमालपत्र, पुदिना, गोड तुळस, लिंबू आणि इतरांचा समावेश आहे. जिरे, कॅरम सीड्स आणि एका जातीची बडीशेप भाजून बनवलेली जादुई पावडर – सर्व समान प्रमाणात तुमच्या पचन आणि एकूण आरोग्यासाठी आश्चर्यकारक काम करू शकते, असे डॉ. डिंपल जांगडा सांगतात.



तुम्ही जेवणापूर्वी अर्धा चमचा ही पावडर दिवसातून तीन वेळा, एक ग्लास पाण्यात लिंबाचे काही थेंब टाकून घेऊ शकता. अपचन, वजन वाढणे, झोप न लागणे आणि तुमची ऊर्जा पातळी वाढवण्यासाठी हे जादुई पेय तुम्हाला मदत करू शकेल. तुम्ही ही पावडर एअर टाईट बाटलीत दोन-तीन महिने सहज ठेवू शकता. यावर भाष्य करताना आयुर्वेदिक अभ्यासक डॉ. डिंपल जांगडा म्हणाल्या की, जिरे चयापचय वाढवतात, कॅलरीज बर्न करतात आणि वजन कमी करण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे तणाव आणि चिंता कमी होण्यास मदत होते. कॅरम सीड्स हे कॅल्शियम, लोह, फायबरचे निरोगी स्त्रोत आहेत, जे संपूर्ण आरोग्य आणि चैतन्य वाढवण्यास योगदान देतात. यात अँटिऑक्सिडंट्सदेखील आहेत, जे मुक्त रॅडिकल्स आणि थकवा आणि एकूण ऊर्जा पातळी सुधारण्यास मदत करतात. ते पोषकद्रव्ये शोषून घेण्यास मदत करतात आणि पोटाजवळ चरबी जमा होण्यास प्रतिबंध करतात.

बडीशेपमध्ये असेच आरोग्य फायदे आहेत. व्हिटॅमिन सी, मॅग्नेशियम, लोह, सेलेनियम, मँगनीज, जस्त, कॅल्शियम, पोटॅशियम आणि तांबे बडीशेपच्या बियांमध्ये आढळतात. या धान्यांचे नियमित सेवन केल्याने शरीराला एक नाही तर अनेक फायदे होतात. हे भूक नियंत्रित करण्यास आणि जास्त खाणे टाळण्यास मदत करते. बडीशेपच्या बियांमध्ये लघवीचे प्रमाण वाढवणारा पदार्थ गुणधर्म असतो, ज्यामुळे पाणी टिकून राहणे, फुगणे आणि वजनाच्या समस्या कमी होण्यास मदत होते. हे चयापचय सुधारू शकते, जलद कॅलरी बर्न आणि वजन कमी करण्यास अनुमती देते, असे डॉ. जांगडा यांनी सांगितले. दुसरीकडे लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर असते, कॅलरीज कमी असतात. असे अनेक गुणधर्म आहेत जे वजन कमी करण्यास मदत करतात. लिंबू पाणीदेखील भूक नियंत्रित करण्यास मदत करते. तर लिंबू खाल्ल्याने पचनक्रिया सुधारल्याने रात्रीची अस्वस्थता कमी होण्यास मदत होते, त्यामुळे गाढ झोप लागते, अशाप्रकारे या जादुई पावडरचा आहारात समावेश केल्याने वजन कमी होण्यास मदत होते.

# मधुचंद्राच्या रात्रीला भयंकर वळण! नवरीच्या 'या' आरोग्य स्थितीने नवऱ्याला बसला धक्का, डॉक्टरांकडुन ऐका कहाणी व उपाय

न्यूरॉलॉजिस्ट डॉ. सुधीर कुमार यांनी अलीकडेच आपल्या द अकाउंटवर एका नवविवाहित जोडप्याची (खरी) कहाणी शेअर केली आहे. आधी आपण ही कहाणी वाचूया, व त्यानंतर या स्थितीमागील कारण, उपाय, याविषयी तज्ज्ञांचे मत जाणून घेऊया

आंतरजातीय विवाहावरील आक्षेपरूपी अडथळा पार करून मिनी (नाव बदललं आहे) आणि मनोज (नाव बदललं आहे) यांचा विवाह पार पडला. लग्नानंतर पहिल्या रात्रीसाठी दोघेही उत्सुक होते पण त्या दोघांनाही माहित नव्हतं की ज्या क्षणाची त्यांनी अनेक वर्षे वाट पाहिली तोच क्षण इतका विचित्र वळण घेऊन त्यांच्यासमोर आव्हान म्हणून उभा ठाकणार आहे. लग्नाच्या सोहळ्यात प्रत्येक विधीचा अनुभव घेताना मिनीच्या चेहऱ्यावर हसू होतं, तिचे सगळे बालपणीचे मित्र लग्नासाठी आले होते, अगदी दूरहुन वेळ काढून सगळे मिनी- मनोजच्या लग्नाचा आनंद साजरा करत होते. सगळे विधी संपेपर्यंत रात्री खूप उशीर झाला होता आणि धावपळीमुळे दोघेही खूप दामले होते पण असं असूनही 'मधू चंद्राच्या रात्रीसाठी' दोघेही उत्सुक होते. दोघांच्याही मनात भीती व उत्साह सांगड घालून धाकधूक वाढवत होते. दोघांचेही वेगवेगळे प्लॅन्स होते पण दोघांपैकी कुणीही पहिले पाऊल उचलण्याआधी थकव्याने आपला प्रभाव दाखवला आणि दोघेही थेट झोपी गेले.

अचानक रात्री मध्येच मिनीला मनोजच्या आरडाओरड्यामुळे जाग आली, मनोज मिनीला जोरजोरात हलवून जागं करण्याचा प्रयत्न करत होता व तिच्यावर ओरडत होता. पहिलं वाक्य जे मिनीने ऐकलं ते म्हणजे, तू हे काय केलंस, मला तुझ्याकडून ही अपेक्षा नव्हती, साहजिकच लग्नाच्या पहिल्या रात्री पतीकडून हे वाक्य ऐकल्यावर मिनीला धक्काच बसला पण अगदी काही सेकंदात तिच्या संदर्भ लक्षात आला. मिनीने पलंगावर झोपेतच लघवी केली होती ज्यामुळे तिचे कपडे, चादर भिजली होती व खोलीतही दुर्गंध पसरला होता.

डॉ कुमार पुढे म्हणाले की, मिनीने झोपेत चुकून लघवी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. तिला लहानपणापासून हा त्रास आहे. आठवड्यातून दोन ते तीन वेळा तरी हे असेच घडायचे. तिच्या पालकांनी ज्या बालरोग तज्ज्ञांशी सल्लामसलत केली होती, त्यांनी त्यांना आश्वासन दिले की ती मोठी झाल्यावर ही समस्या स्वतःच संपून जाईल. आणि खरंच, काही काळानंतर, मिनीने अंथरुण भिजवण्याची वारंवारता कमी झाली परंतु ती पूर्णपणे थांबली नाही. किशोरवयात, मिनीला याची खूप लाज वाटायची पण डॉक्टरांचा सल्ला घेण्याइतके धैर्य तिला एकवटता आले नाही. या समस्येमुळे तिचा आत्मविश्वास कमी झाला होताच पण ती अनेकदा नैराश्याचा सामना करत होती.

मिनीने तिच्या समस्या तिच्या पतीला तपशीलवार सांगण्यासाठी पुरेसे धैर्य एकवटले आणि मग त्यानेच तिला डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. मिनीची स्थिती ही 'पेर्लीीपरश्र लशवुर्शीीळपस' म्हणजे रात्रीच्या वेळी अंथरुणात लघवी होण्याची सवय याचे उदाहरण होती, याला वैद्यकीयदृष्ट्या नॉक्टर्नल एन्युरेसिस असे संबोधले जाते. डॉ. कुमार यांनी या प्रकरणात मिनीवर युरोलॉजी आणि मानसोपचार तज्ज्ञांची मते घेऊन औषधोपचार सुरू केले. उपचाराने तिच्यात लक्षणीय सुधारणा झाली. ही झाली मिनी व मनोजची गोष्ट पण आता आपल्याला हे समजून घेण्याची गरज आहे की ही 'नॉक्टर्नल एन्युरेसिस' स्थिती उद्भवते कशामुळे? त्यावर उपाय काय? चला तर मग आपण डॉ. कुमार यांचे मत वाचूया.. नॉक्टर्नल एन्युरेसिस/ रात्री अंथरुणात लघवी होणे ही स्थिती का उद्भवते? सोप्या शब्दात, ही एक सामान्य स्थिती आहे जिथे एखाद्याला त्यांच्या मूत्राशयाच्या हालचालींवर नियंत्रण ठेवता येत नाही परिणामी झोपेच्या वेळी चुकून लघवी होते. लहान मुलांमध्ये हा त्रास अत्यंत सामान्य आहे पण वेळेनुसार वय व समज वाढत असताना ही सवय सुटते. काही असामान्य स्थितींमध्ये प्रौढ वयात सुद्धा ही अवस्था कायम राहते. नॉक्टर्नल एन्युरेसिस ही प्रौढांमधील अत्यंत दुर्मिळ स्थिती आहे व केवळ २ ते ३ टक्के प्रौढांना याचा त्रास होतो. दर सहा महिन्यांनी ते आठवड्यातून/महिन्यातून किमान एक वेळा असा त्रास होत असतो.डॉ जगदीश काथवटे, सल्लागार नवजात रोग विशेषज्ञ आणि बालरोगतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल खराडी पुणे यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, मेंदू आणि मूत्राशय यांच्यात समन्वय नसणे, नियंत्रण क्षमतेचा उशिराने किंवा कमी झालेला विकास, मूत्राशयाचे अपेक्षापेक्षा कमी क्षमता, थकवा, भावनिक ताणतणाव, हे विविध पैलू नॉक्टर्नल एन्युरेसिससाठी कारणीभूत ठरू शकतात. टाळण्यासाठी उपाय काय? झोपण्याच्या दोन ते तीन तास आधी द्रवपदार्थ टाळणे किंवा मर्यादित करणे, बाथरूम ब्रेक शेड्यूल करणे आणि बाथरूम सहज उपलब्ध आहे याची खात्री करून तुम्ही अंथरुण ओले जाण्याचा धोका कमी करण्यासाठी आवश्यक खबरदारी घेऊ शकता, असे डॉ. काथवटे यांनी सांगितले. काय लक्षात ठेवावे? पालक आणि भागीदारांनी समस्या समजून घेणे आणि त्या व्यक्तीला वैद्यकीय मदत घेण्यास प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. सतत ओरडणे आणि टोमणे मारणे याने मन दुखावले जाऊ शकते आणि हळूहळू त्यांचा आत्मविश्वास कमी होऊन त्यांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, असेही डॉ काथवटे यांनी नमूद केले.

# लातूर शहरातील सर्वच होर्डिंग्ज काढा म्हणणं मनपाचे अन्यायी धोरण - अधिकृत जाहिरात एजन्सीधारकांचे पत्रकार परिषदेत स्पष्टीकरण

## अनधिकृत व अधिकृतसह जाहिरात एजन्सीधारकांना नोटीस बजावणं व मालमत्ताधारकांवर गुन्हे दाखल करणे हे चुकीचे

शासकीय तंत्रनिकेतनकडील होर्डिंग्जचे स्टॅबिलिटी व स्ट्रक्चरल ऑडिटचे काम चालू आहे. ऑडिट रिपोर्ट येईपर्यंत मनपाने आम्हाला सहकार्य करावे. मनपाने सर्व जाहिरातदारांना समान वागणूक द्यावी. ही कळकळीची विनंती.



लातूर: – लातूर शहरातील अधिकृत आणि अनधिकृत होर्डिंगजचा विचार न करता लातूर महापालिकेने सरसगट सर्व मालमत्ताधारक व जाहिरात एजन्सीधारकांना होर्डिंग्ज काढण्यासाठीच्या नोटीसा बजावल्या आणि गुन्हे दाखल केले. हे अत्यंत चुकीचे व अन्यायी धोरण आहे. मनपाने अधिकृत जाहिरात एजन्सीधारकांच्या परवान्याचे नुतनीकरणाचे प्रस्ताव एका रात्रीत रद्दबातल ठरवले असून पुन्हा नुतनीकरण प्रस्ताव आणि स्ट्रक्चरल ऑडिट मनपाकडे सादर करावेत, असे परिपत्रक काढले आहे. आणि दुसरीकडे अधिकृत असलेल्या शहरातील होर्डिंग्ज काढण्याची मोहिम सुरु ठेवली आहे. सदरची कार्यवाही थांबवण्यात यावी. अशी मागणी आज २१ जून रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान महात्मा गांधी चौक येथील रसिका हॉटेल येथे झालेल्या पत्रकार परिषदेत जाहिरात एजन्सीधारकांनी संयुक्तरित्या मनपा व शासनाकडे केली आहे. या पत्रकार परिषदेला नेटीजन्स मीडिया सर्व्हीसेस अजय बोराडे पाटील, विशाल ॲडस विकास बारुळे आणि इनेटिव्ह मीडियाचे योगेश गुंडावार आदी जाहिरात एजन्सीधाक आणि कायदेशीर सल्लागार ॲड. निलेश मुचाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व नियमांचे पालन करून, मनपाचा रितसर परवाना घेवून व टॅक्स भरून ज्या स्ट्रक्चरर्स नियमित केल्या आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात येवू नये, रिकाम्या स्ट्रक्चरमुळे काही अनुचित घटना घडली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी सदारीज जाहिरात एजन्सीधारकांची राहिल, तसेच मनपाच्या नियंमांचे आधीपासूनच पालन करून सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेली आहे. तसेच नुतनीकरणाचे प्रस्तावासाठी आपण सुचवलेली नवीन कागदपत्रे जसे की शासकीय यंत्रणेमार्फत केलेले स्टॅबिलिटी स्ट्रक्चरल सर्टीफिकेट देण्यासही आम्ही तयार आहेत. आणि त्या प्रमाणे सोलापूर तंत्रनिकेत महाविद्यालय यांच्याकडे मागणी करून त्यासाठी नियमानुसार फीसचा भरणा देखील केलेला आहे. लवाकर ऑडिट रिपोर्ट करून देण्याचे सदर महाविद्यालयाने मान्य केले आहे. लातूर मनपाने शहरातील परवानाधारक अधिकृत होर्डिंग्ज स्ट्रक्चरवर तुर्त कारवाई करू नये असे आज जाहिरात एजन्सीधारकांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले आहे. शहरातील जाहिरात एजन्सीधारकांकडून शासकीय यंत्रणेकडून होर्डिंग्जचे स्टॅबिलिटी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करून घेण्यात येत आहे. सदर जाहिरात व्यावसायावर हजारो कुटुंबाचे उदरनिर्वाह चालतात. स्ट्रक्चर स्टॅबिलिटी सर्टिफिकेट घेवून ते दाखल करण्याचे कामही सुरु आहे. त्यामुळे मनपाने अधिकृत होर्डिग्ज स्ट्रक्चरवरील तात्काळ कारवाई करण्याची मोहिम थांबवली पाहिजे. तसेच सर्व जाहिरातदारांना मनपा आयुक्तांनी समान न्याय द्यावा. शहरातील जाहिरात फलकांवरील फ्लेक्स काढून टाकण्यात आल्यामुळे याचा कसलाही धोका राहिलेला नाही. शिवाय जाहिरात एजन्सीधारकांनी शहरातील बहुसंख्य होर्डिंग्ज स्वता होवून काढून घेतलेल्या आहेत. तसेच सदर होर्डिंग्ज काढण्यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल असून येत्या ३ जुलै रोजी यावर सुनावणी होणार आहे. तुर्त लातूर मनपाने होर्डिंग्ज, बोर्ड काढण्याची मोहिम थांबवावी. अशी अपेक्षा आजच्या पत्रकार परिषदेत सदर जाहीरात एजन्सीधारकांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्रात सर्व मनपा व नगर परिषदांमध्ये होर्डिंग्जच्याबाबतीत जे नियम आहेत, तेच नियम लागू करून आमचे नुतनीकरण करून लवकरालवकर द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# एकनाथ खडसेंनी घेतली अमित शाहांची भेट

नवी दिल्ली : ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी भाजपच्या नवनिर्वाचित खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे देखील उपस्थित होत्या. दरम्यान, एकनाथ खडसे अजूनही भाजप प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी जोर धरला आहे.गुरुवारी रात्री एकनाथ खडसे आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. ही सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून एकनाथ खडसे भाजपमधे प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्याच पार्श्वभूमीवर एकनाथ खडसे आणि अमित शाह यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. भाजपमध्ये एकनाथ खडसे यांना मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची चर्चा देखील सुरु आहे. दरम्यान, भाजपवर नाराज झालेल्या एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र, आता एकनाथ खडसे पुन्हा स्वगृही परतणार आहेत. याबाबत काही दिवसांपूर्वी एकनाथ खडसे यांनी स्वत: कबुली दिली होती. पण अद्याप त्यांचा पक्षप्रवेश झालेला नाही. फक्त प्रवेशाच्या चर्चा सुरु आहेत. आता त्यांचा पक्ष प्रवेशाचा मुहूर्त कधी लागतो, याकडे त्यांच्या समर्थकांचे, हितचिंतकांचे लक्ष लागले आहे.योग्यवेळी प्रवेश गेल्या काही दिवसांपूर्वी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबद्दल भाष्य केले होते. नाथाभाऊ मोठे नेते आहेत. त्यांच्या प्रवेशासंदर्भात आमचे केंद्राचे आणि राज्याचे वरिष्ठ नेते लवकरच निर्णय घेतील.



तसेच, योग्यवेळी नाथाभाऊंचा भाजपमध्ये प्रवेश होईल असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला होता.

# किनवट तालुक्यात ३३ बालके कुपोषित

किनवट /शेख शौकत :–जिल्ह्यात कुपोषण मुक्तनांदेड अभियान राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी गुरुवारी गाभा समितीची बैठक प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी घेतली. कुपोषणाचे गंभीर सॅम ३३ व मध्यम मॅम १११ बालके तपासणीत आढळून आले आहे. या बैठकीला अनुपस्थितीत असलेल्या सीडीपीओना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात येणार असल्याचे प्रकल्प कार्यालय सूत्रांनी दिली आहे. सर्व अंगणवाड्यात ० ते ६ वयोगटातील सर्व बालकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या तपासणीत बालकांची स्थिती समजून घेण्यात आली. त्यात ३३ सॅम बालके व मॅँम १११बालके आढळून आली आहेत. बाल मृत्यूमाता मृत्यू टाळण्यासाठी चर्चा करण्यात आली. गळके आरोग्य उप केंद्र, निवासस्थाने यावरही चर्चा करण्यात आली. बालकांचे कुपोषण मुक्त करण्यावर भर दिला जाणार आहे. त्या दृष्टीने उपाययोजना राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी गटविकास अधिकारी पुरुषोत्तम वैष्णव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. के. पी. गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. माचेवार, डॉ. अशोक बेलखोडे यांची उपस्थिती होती.



# लातूर पोलिस भरती प्रक्रिया सलग तिसऱ्या दिवशी सुरु

लातूर :– लातूर जिल्हा पोलीस दलातील रिक्त पदासाठी घेण्यात येत असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेतील मैदानी चाचणी परीक्षा आज सलग तिसऱ्या दिवशी सुरू ठेवण्यात आली. पोलीस भरतीच्या तिसऱ्या दिवशी १०६८ उमेदवारांना बोलविण्यात आले होते. त्यापैकी ६६५ उमेदवार मैदानी चाचणी प्रक्रिया करिता हजर झाले होते. हजर उमेदवारांमधील ५७२ उमेदवार मैदानी चाचणीसाठी पात्र झाले. आजच्या मैदानी चाचणी प्रक्रियेसाठी उपस्थित उमेदवारांमध्ये पुरुष आणि महिला उमेदवारांचा समावेश होता. मैदानी चाचणी प्रक्रिया दिनांक २४ जून २०२४ पर्यंत चालणार आहे. उद्या दिनांक २२ जून रोजी ८०० उमेदवारांना मैदानी चाचणीसाठी बोलण्यात आले आहे.

# भारतीय खासदारने खलिस्तानी समर्थकांना फटकारले

टोरंटो : खलिस्तानी दहशतवादी हरदीप सिंग निज्जरच्या हत्येनंतर भारत आणि कॅनडाचे संबंध बिघडले आहेत. मंगळवारी निज्जरच्या हत्येला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त कॅनडाच्या संसदेत मौन पाळण्यात आले. यावरून आता एका भारतीय वंशाच्या खासदाराने कॅनडाच्या संसदेतून खलिस्तानी समर्थकांवर जोरदार टीका केली. खासदार चंद्रा आर्य यांनी संसदेला खलिस्तानी दहशतवाद्यांनी कॅनडियन विमानाला बॉम्बने उडवल्याचीही आठवण करून दिली.

चंद्रा आर्य म्हणाले की, खलिस्तानी दहशतवादी भारताचेच नव्हे, तर कॅनडाचेही नुकसान करत आहेत. यावेली त्यांनी १९८५ मध्ये एअर इंडियाच्या फ्लाइटमध्ये झालेल्या स्फोटाची आठवण करून दिली. तसेच, त्यांनी २३ जून रोजी १९८५ च्या बॉम्बस्फोटातील बळींच्या स्मरणार्थ एका कार्यक्रमाचे आयोजन केल्याचे माहिती दिली आणि सर्वांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहनही केले. २३ जून २०२४ रोजी राजधानी ओटावा येथील डाऊ लेकजवळील स्मारकाच्या ठिकाणी आणि ओंटारियोमधील क्विन्स पार्कमध्ये दुपारी १२ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

चंद्रा संसदेत बोलताना म्हणाले की, खलिस्तानी समर्थक देशात हिंसाचाराला प्रोत्साहन देत आहेत. २३ जून हा दहशतवादामुळे बळी पडलेल्यांचा स्मृतिदिन आहे. ३९ वर्षांपूर्वी याच दिवशी एअर इंडियाचे विमान हवेत असताना उडवण्यात आले होते. त्या घटनेत ३२९ प्रवासी आणि क्रू मेंबर्सचा मृत्यू झाला होता. कॅनडाच्या इतिहासातील हा सर्वात मोठा हल्ला होता, ज्यात एकूण २६८ कॅनेडियनही ठार झाले होते. नुकतेच भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी, यांच्या हत्येचा कॅनडाच्या संसदेत जल्लोष साजरा करण्यात आला.

# किनवट माहुर तालुक्यातील बनावट दारूचे पेव फुटले राज्य उत्पादन शुल्क रसद गोळा करण्यात मशगुल

किनवट /शेख शौकत :–किनवट माहूर तालुक्यातील ग्रामीण भागात दिवसाढवळ्या टपऱ्या, हॉटेल व ढाब्यावर अनधिकृतपणे विदशी दारू तर गावठी दारुची विक्री होत आहे. काही गावात थेट गावठी दारू काढण्याचे कारखाने पेव फुटल्याचे बोलले जात आहे. हे सर्व घडत असताना यावर नियंत्रण ठेवणारे किनवटचा राज्य उत्पादन शुल्क विभाग रसद गोळा करण्यात मशगुल असल्याचा आरोप होत आहे. नांदेड जिल्ह्याचा अंदमान निकोबार संबोधल्या जाणाऱ्या किनवट माहूर हे तालुके जिल्हा मुख्यालयापासून दीडशे ते दोनशे किलोमीटर अंतरावर आहे. अशात जिल्ह्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना अंधारात ठेवून तालुका स्तरावरील अधिकारी यांच्या अर्थपूर्ण संबंधातून दारू व्यवसाय जोमात सुरू आहेत. मग ते राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या अर्थपूर्ण दुर्लक्ष करून अवैध व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ झाली असून त्यातून गुन्हेगारी प्रवृत्ती उदयास येत आहे. किनवट माहूर तालुक्यातील आज घडीला दारू विक्रीचे अनुज्ञप्तीधारक दुकाने बोटावर मोजण्या इतकी असताना तालुक्यातील ग्रामपंचायती अंतर्गत गावेवाडी तांडे पाड्यामध्ये प्रत्येक ठिकाणी गावठी हातभट्टीसह देशी व विदेशी दारू उपलब्ध आहे. कार्यवाही करण्यासंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता आमच्याकडे मनुष्यबळ कमी असल्याने प्रत्येक ठिकाणी जाऊन कारवाई करणे शक्य नसल्याचे बोलण्यात येते, परंतु परवानाधारक वार, देशी दारू दुकान, वाईन शॉप याच्या नूतनीकरणाच्या वेळेस व महिन्याच्या विशिष्ट तारखेला प्रतिनिधी पाठवून रसद गोळा करण्याचे कर्तव्य मात्र हे लोकं नित्यनियमाने पार पाडतात. त्यामुळेच की काय यांचे तालुक्यातील येणारी बनावट दारू व खेडेगावात पाडली जाणारी हातभट्टीची दारू बनवणाऱ्यावर कारवाई करण्यासाठी वेळ मिळत नाही. दारू पिल्याने मद्यपिंचे केवळ संसार उघड्यावर येत नाही तर रासायनिक प्रक्रिया केलेली विषारी दारू पिऊन जीव धोक्यात येत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग किनवटचे कार्यालय फक्त शोभेची वस्तू बनली असून येथील निरीक्षक व दुय्यम निरीक्षक आणि त्यांचे अधिनस्त कर्मचारी उंटावर बसून शेळ्या राखण्याचे काम करत आहे, या प्रकरणी अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क नांदेड यांनी प्रभावी कारवाई करावी अशी मागणी होत आहे. किनवटचे दुय्यम निरीक्षक यांना संपर्क साधून त्यांच्याकडून प्रतिक्रिया जाणून घेतली असता त्यांनी आम्ही कारवाई करत आहोत, इतके बोलून अतिशय नाराजीने संपर्क समाप्त केला.



किनवट माहूर तालूका हा अवैध धंदे व्यवसायाने दोन्ही तालुके आता विहारच्या दिशेने जात आहेत? असा प्रश्न सर्वे सामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे.

# पेपर फुटीसंदर्भात नवा कायदा आणणार

लखनौ : स्पर्धा परीक्षांमधील पेपरफुटीचा मुद्दा सध्या संपूर्ण देशभरात चर्चेचा विषय बनला आहे. काही दिवसांपूर्वी, उत्तर प्रदेश पोलिस भरतीचा पेपर फुटला होता. तर आता नीट आणि यूजीसी नीटचा पेपर फुटला आहे. यामुळे संपूर्ण देशात एकच खळबळ उडाली आहे. या पेपर फुटी विरोधात विद्यार्थी आणि नेतेमंडळीही रस्त्यावर उतरले आहेत. यातच, आता उत्तर प्रदेश सरकार पेपरफुटी रोखण्यासाठी आणि सॉल्व्हर गँगला आळा घालण्यासाठी नवा कायदा आणण्याच्या तयारीत असल्याचे वृत्त आहे. या नव्या कायद्यात पेपरफुटी आणि सॉल्व्हर गँगसोबत सहभागी असलेल्यांवर कडक कारवाईची तरतूद असेल. यात जबरदस्त दंड, बुलडोझर कारवाई आणि तुरुंगवासाची तरतूद असेल. योगी सरकारने पेपर फुटीला आळा घालण्यासाठी नवे धोरण जाहीर केले आहे. २ अथवा त्याहून अधिक पेपर सेट असायला हवेत. प्रश्नपत्रिकेच्या प्रत्येक सेटची छपाई वेगवेगळ्या एजन्सींकडून केली जाईल. पेपर कोडिंगमध्येही आणखी सुधारणा केली जाईल. याशिवाय, निवड परीक्षांच्या केंद्रांसाठी, केवळ सरकारी माध्यमिक, पदवी महाविद्यालये, विद्यापीठे, पॉलिटेक्निक, अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये अथवा स्वच्छ ट्रॅक रेकॉर्ड असलेल्या सुप्रसिद्ध, अर्थसहाय्य केले जाते अशी, शैक्षणिक संस्थांचीच निवड केली जाईल. महत्वाचे म्हणजे, या केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणाही असले. वेगवेगळ्या एजन्सींना जबाबदारी एका भरती परीक्षेसाठी चार एजन्सींना जबाबदारी दिली जाईल. परीक्षा देणा–या विद्यार्थ्यांना आपल्या जिल्ह्याबाहेर अथवा तालुक्याबाहेर जावे लागेल. दिव्यांग आणि महिलांना हे लागू नसेल. तसेच, ४ लाखाहून अधिक परीक्षार्थी असल्यास दोन टप्प्यांत परीक्षा असेल. पीसीएस परीक्षा एकाच पाळीत घेण्याची सूट असेल. याशिवाय, रिझल्ट तयार करण्यातील गडबड रोखण्यासाठी आयोग आणि बोर्डातच ओएमआर शीटचे स्कॅनिंग केले जाईल. पेपरमध्ये राहणार गोपनीय कोड महत्वाचे म्हणजे, प्रश्नपत्रेत गोपनीय कोडही असतील. प्रश्नपत्रिकेच्या प्रत्येक पानावर युनिक बारकोड, क्यूआर कोड, युनिक सिरियल नंबर यांसारखी गोपनीय सुरक्षा चिन्हेही टाकावी लागतील. प्रश्नपत्रिका आणण्यासाठी अथवा नेण्यासाठी वापरण्यात येणारे बॉक्सला टेंपर प्रूफ मल्टी लेअर पॅकेजिंग असेल. प्रश्नपत्रिका सेटिंगसाठी पुरेसा वेळ दिला जाईल. तसेच परीक्षा नियंत्रकांकडून प्रश्नपत्रिका छापणा–या संस्थांची नियमित पाहणीही केली जाईल. प्रिंटिंग प्रेसमध्ये नियमावली प्रिंटिंग प्रेससंदर्भात पूर्णपणे गोपनीयता ठेवली जाईल. प्रेसमध्ये येणा–यांची तपासणी केली जाईल. सर्वांकडे ओळखपत्र असणे बंधनकारक असेल. बाहेरील व्यक्तीला प्रेसमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. प्रेसमध्ये स्मार्टफोन आणि कॅमेरा नेण्यास बंदी असेल. तसेच, प्रेसभोवती सीसीटीव्ही कॅमेरे बसवलेले असतील आणि त्यांचे रेकॉर्डिंग पुढील १ वर्षापर्यंत सुरक्षित ठेवले जाईल.



# सुभाष दगडू कांबळे याच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा द्या -फकिरा ब्रिगेडची मागणी

लातूर /प्रतिनिधी :– मयत सुभाष दगडू कांबळे (वय ४२) रा.कन्नड ता.कन्नड जि.छत्रपती संभाजी नगर याचा दिनांक १६ जून २०२४ रविवार रोजी दुपारी दीड वाजता अझर अख्तर अली यांने शनि मंदिर रोडवर बोलावून घेऊन मोबाईल घेतल्याच्या संशयावरून हातपाय बांधून भर रस्त्यावर लाकडी दांड्याने अमानुषपणे मारहाण केली या मारहाणीतच सुभाष कांबळे यांचा मृत्यू झाला.

त्यामुळे अख्तर अली या गावगुंडावर कलम ३०२ व अनुसूचित जाती, जमाती प्रतिबंधात्मक कलमा खाली गुन्हा दाखल करण्यात यावा, तसेच सुभाष कांबळे यांच्या कुटुंबियांना शासनाने पन्नास लाख रुपये मदत करावी आणि त्यांच्या कुटुंबियांचे जिल्ह्याच्या ठिकाणी पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी फकिरा ब्रिगेडच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस,मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. अख्तर अली या गावगुंडावर कडक कारवाई नाही केली तर ,

फकिरा ब्रिगेड या सामाजिक संघटनेच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल आंदोलनानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीस शासन जबाबदार राहील असेही या निवेदनात म्हटले आहे.या निवेदनावर प्रा.डॉ.संजय शिंदे प्रा.राजेंद्र लोदगेकर, श्रीरंग सरवदे श्री अंकुश कांबळे, संजय विरूळे,संतोष पटनुरे गोविंद धबडगे, शरद धबडगे, सूर्यकांत कदम,मुकेश लोंढे, रणजित मिसाळ, बाळू लोखंडे,व्ही.सी.भूयागळे, मच्छिंद्र खंदारे, बाबासाहेब नवगिरे,संजय भालेराव, सुशिल लोखंडे,नागिनी थोरात, उर्मिला नवगिरे , सुभाष गायकवाड, सतीश शिंदे, ऋषिकेश भडंगे, अजितकुमार शिंदे, लक्ष्मण खंडाळे, सुदर्शन शिंदे, रघुनाथ मस्के, अंगद कांबळे, सचिन शिंदे, पांडुरंग मस्के, सतीश मस्के यांच्या सह्या आहेत



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE